**जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील <u>दक्षता पथकाकडील पदांचा आढावा-</u> आकृतीबंध सुधारित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
जलसंपदा विभाग,
शासन निर्णय क्रमांकःआढावा-२०१२/६८/(४७/२०१२)/दक्षता-१,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
दि.१३ /०३/२०१२.

<u>वाचा</u> :- (१) शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्र. दक्षता-१०७९/१४२६/दक्षता-१, दि.२० ऑगस्ट, १९८५.
(२) शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्र.आढावा-२००८/(११२/२००८)/दक्षता-१, दि.२६/०५/२००८.

**प्रस्तावना :-**

जलसंपदा विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयातील गैरव्यवहार, भ्रष्टाचार, लाचलुचपत इ. बाबत अनेक तक्रारी शासनाकडे येत असतात. अशा तक्रारींची प्रारंभिक चौकशी करणे आणि गैरप्रकारांना आळा घालणे यासाठी अधीक्षक अभियंता हे प्रमुख असलेली सहा दक्षता पथके दि. २०/०८/१९८५ च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आली. त्यानुसार दक्षता पथक ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर प्रत्येक दक्षता पथकासाठी १० पदे (एकूण ६०) मंजूर करण्यात आली. मध्यंतरीच्या काळात दक्षता पथक, नाशिक यांच्याकडील कामे कमी झाल्यामुळे त्या दक्षता पथकाकडील कामे दक्षता पथक, ठाणे यांचेकडे वर्ग करुन दक्षता पथक, नाशिक बंद करण्यात आले त्यामुळे उर्वरित ५ दक्षता पथकांकडे मंजूर पदे ५० इतकी राहिली.

२. कालौघाने दक्षता पथक, ठाणे यांच्याकडे मुंबई परिमंडळातील ५ जिल्हयांबरोबर उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक अंतर्गत ५ जिल्हयांचा कार्यभार वाढल्याने तसेच दक्षता पथक, औरंगाबाद या कार्यालयाकडील कामाचा भार वाढल्याने या दोन दक्षता पथकांसाठी प्रत्येकी ५ पदे शासन निर्णय क्र. आढावा-१००३/(१४३/२००३) दक्षता-१, दि. २०/०४/२००७ अन्वये उपलब्ध करुन देण्यात आली. त्यामुळे यापूर्वी ५ दक्षता पथकांकडील ५० पदे अधिक उपरोक्त १० पदे अशा एकूण ६० पदांचा आकृतीबंध शासन निर्णय दि.२०/०४/२००७ अन्वये निश्चित करण्यात आला.

३. तद्नंतर शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्र.आढावा-१००७/१४/(१७८/०७)/आ(प्रशि),दि.३१/०५/२००७ अन्वये अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे हे कार्यालय कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचेकडे वर्ग झाल्याने सदर परिमंडळाच्या कामकाजाशी संबंधित असलेली ५ मंजूर पदे अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे यांचेकडे वर्ग करण्यात आली आहेत.

४. तसेच शासन निर्णय, जलसंपदा विभाग,क्र.आढावा-१००७/(२००/०७)/आ(प्रशि),दि.२०/०६/२००७ अन्वये अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला अंतर्गत असलेली

परिमंडळ शाखेतील ५ पदे अधीक्षक अभियंता,दक्षता पथक, अमरावती यांचेकडे आणि नागपूर परिमंडळ कार्यालयातील कार्यरत असलेली शाखा ५ मंजूर पदांसह अधीक्षक अभियंता,दक्षता पथक,नागपूर यांचेकडे वर्ग करण्यात आली.

५. त्यानुसार ५ दक्षता पथकांसाठीची असलेली ६० पदे व वरीलनुसार उपलब्ध झालेली १५ पदे अशा एकूण ७५ पदांचा सुधारित आकृतीबंध शासन निर्णय क्र. आढावा-२००८/(११२/२००८)दक्षता-१,दि.२६/०५/२००८ अन्वये निश्चित करण्यात आला आहे.

६. आता शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्रःलाक्षेवि-१००८/(१४७/२००८)/लाक्षेवि(आ),दि. ३०/०९/२००८ अन्वये अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे यांचे अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता, जायकवाडी भूजल निस्सारण विभाग, औरंगाबाद हे कार्यालय प्रशासकीय कारणास्तव बंद करण्यात आले असून सदरहू कार्यालयाच्या मंजूर आस्थापनेवरील एकूण २६ पदांपैकी ५ पदे (कनिष्ठ अभियंता-२ पदे, प्रथम लिपिक-१ पद, टंकलेखक- १ पद, चौकीदार- १ पद ) शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्रमांकःआढावा-२००९/(७७/२००९)दक्षता-१, दि. १६/०९/२००९ अन्वये अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आली आहेत. सदर ५ पदांचा दक्षता पथकाच्या आकृतीबंधात समावेश करुन सुधारित आकृतीबंध निश्चित करणे आवश्यक आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

त्यानुसार संदर्भाधीन दि. २६/०५/२००८ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या आकृतीबंधाप्रमाणे ५ दक्षता पथकांकडील ७५ पदे अधिक वरीलनुसार उपलब्ध झालेली ५ पदे अशा एकूण ८० पदांचा सुधारित आकृतीबंध कार्यालयनिहाय सोबतच्या विवरणपत्रामध्ये निश्चित करण्यात येत आहे.

सदर पदे ही विभागाने निश्चित केलेल्या क्षेत्रिय आस्थापनेच्या आढाव्या अंतर्गत मंजूर असलेल्या ४५,२९७ पदसंख्येच्या मर्यादेत असल्याने नवीन पदनिर्मितीचा शासनास कोणताही अतिरिक्त वित्तीयभार पडणार नाही.

सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०३१३०९२८२२३२२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सहपत्र : विवरणपत्रे (एकूण ५)

( ग.शा.सोनावणे )
शासनाचे अवर सचिव

प्रत,

१.महालेखापाल, (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
२.प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास ) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३.सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे / ठाणे/ औरंगाबाद / नागपूर / अमरावती.
५.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

६.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
७.अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद.
८. कार्यासने :- दक्षता-२/ दक्षता-३/ आ (वर्ग-१)/ आ (वर्ग-२)/ आ (शा.अ.)/ आ (प्रशिक्षण)/ आ (क्षेप्र)/ आ (तांत्रिक)/ आ (अतांत्रिक) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

दक्षता-१ कार्यासन संग्रहार्थ.

( शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्रःआढावा-२०१२/६८(४७/२०१२)/दक्षता-१,दि. /०३/२०१२ चे सहपत्र)

**विवरणपत्र-अ**

अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, मुंबई विभाग, ठाणे यांच्या कार्यालयातील आकृतीबंध

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे |
|---|---|---|
| १ | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | १ |
| २ | उप अभियंता (स्थापत्य) | २ |
| ३ | सहायक अभियंता श्रेणी-२ | २ |
| ४ | प्रथम लिपिक | २ |
| ५ | वरिष्ठ लिपिक | ३ |
| ६ | कनिष्ठ लिपिक | १ |
| ७ | टंकलेखक | ३ |
| ८ | वाहन चालक | २ |
| ९ | शिपाई | ३ |
| १० | चौकीदार | १ |
| **एकूण** | | **२०** |

**विवरणपत्र-ब**

अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, पुणे यांच्या कार्यालयातील आकृतीबंध

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे |
|---|---|---|
| १ | अधीक्षक अभियंता | १ |
| २ | उप अभियंता (स्थापत्य) | २ |
| ३ | उप अभियंता (यांत्रिकी ) | - |
| ४ | वरिष्ठ लिपिक | २ |
| ५ | टंकलेखक | १ |
| ६ | वाहन चालक | २ |
| ७ | शिपाई/चौकीदार | २ |
| **एकूण** | | **१०** |

**विवरणपत्र-क**

अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील आकृतीबंध

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | सुधारित पदे |
|---|---|---|---|
| १ | अधीक्षक अभियंता | १ | १ |
| २ | उप अभियंता (स्थापत्य) | २ | २ |
| ३ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | - | २ |
| ४ | प्रथम लिपिक | १ | २ |
| ५ | वरिष्ठ लिपिक | ३ | ३ |
| ६ | कनिष्ठ लिपिक | १ | १ |
| ७ | लिपिक - टंकलेखक | २ | ३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | वाहन चालक | २ | २ |
| ९ | शिपाई | ३ | ३ |
| १० | चौकीदार | - | १ |
| **एकूण** | | **१५** | **२०** |

कृ.मा.प.

**विवरणपत्र-ड**

अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, नागपूर यांच्या कार्यालयातील आकृतीबंध

| **अ.क्र.** | **पदनाम** | **मंजूर पदे** |
|---|---|---|
| १ | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | १ |
| २ | उप अभियंता (स्थापत्य) | २ |
| ३ | प्रथम लिपिक | १ |
| ४ | वरिष्ठ लिपिक | ३ |
| ५ | कनिष्ठ लिपिक | १ |
| ६ | टंकलेखक | २ |
| ७ | वाहन चालक | २ |
| ८ | शिपाई/चौकीदार | ३ |
| **एकूण** | | **१५** |

**विवरणपत्र-ई**

अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, अमरावती यांच्या कार्यालयातील आकृतीबंध

| **अ.क्र.** | **पदनाम** | **मंजूर पदे** |
|---|---|---|
| १ | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | १ |
| २ | उप अभियंता (स्थापत्य) | २ |
| ३ | प्रथम लिपिक | १ |
| ४ | वरिष्ठ लिपिक | ३ |
| ५ | कनिष्ठ लिपिक | १ |
| ६ | टंकलेखक | २ |
| ७ | वाहन चालक | २ |
| ८ | शिपाई/चौकीदार | २ |
| ९ | शिपाई | १ |
| **एकूण** | | **१५** |

( ग.शा.सोनावणे )

शासनाचे अवर सचिव